दैनिक

# रायगड नगरी

अन्यायाचा प्रतिकार — महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १९० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.५ ऑक्टोबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# ग्रामस्थांचा विरोध डावलून पनवेलमध्ये एअर फोर्स प्रकल्प होऊ देणार नाही!

## सर्वपक्षीय बैठकीत आ.प्रशांत ठाकूर यांची भूमिका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील कोळवाडी व पाले बुद्रुक परिसरातील ग्रामस्थांचा विरोध डावलून तेथे एअर फोर्स प्रकल्प होऊ देणार नाही, अशी स्पष्ट भूमिका भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी जमीन संपादनाबाबत चर्चा करण्यासाठी उपविभागीय अधिकार्यांनी बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत मांडली.

कोळवाडी व पाले बुद्रुक परिसरातील १८० एकर जमीन एअर फोर्स प्रकल्पासाठी संपादन करण्याबाबत पनवेलच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी बोलाविलेल्या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, बाळाराम पाटील, काँग्रेसचे आर. सी. घरत, शिवसेनेचे बबन पाटील, पं. स. सदस्य काशिनाथ पाटील, शेतकरी संघर्ष समितीचे आमोद ठक्कर, संरक्षण खात्याचे अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी सर्वांनी या भूसंपादनाला विरोध दर्शविला.



या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, या प्रकल्पाला १८० एकर जागा लागणार असून त्यामुळे ९०० चौरस मीटर परिसरातील ग्रामस्थांच्या बांधकामांवर बंधन येणार आहेत. तीन मीटरपेक्षा उंच बांधकाम करता येणार नाही. त्यामुळे स्थानिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. ते पाहता देशासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा असला, तरी स्थानिक प्रकल्पग्रस्तांचा विरोध डावलून प्रकल्प होऊ नये. उरण तालुक्यातील मोरा येथे नॅशनल अमिनेशन डेपो (एनएडी)मुळे तेथील स्थानिकांच्या बांधकामावर बंधने आली. आज त्यांच्या पूर्वी केलेल्या बांधकामांवरही कायम टांगती तलवार आहे. अशा समस्यांना तोंड द्यावे लागू नये. त्याची पुनरावृत्ती येथे घडू नये यासाठी मी तुमच्यासोबत असल्याची ग्वाहीदेखील या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली

# विद्यालयात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ; पुष्पगुच्छ देऊन केले प्राचार्यांनी स्वागत



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कोरोना महामारी च्या दहशती नंतर तब्बल दोन वर्षानंतर शाळांची घंटा आज वाजली. शिक्षक पालक विद्यालय कर्मचाऱ्यांना ही याबाबत उत्सुकता लागून राहिली होती. आज कळंबोली सुधागड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे हजेरी लावून विद्यालयात प्रवेश घेतला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे व शिक्षक कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आज विद्यालयात विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय असल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

कोरोना संकटामध्ये ऑनलाइन शिक्षण सुरू होते. तब्बल दोन वर्षाचा काळ हा घरी बसूनच शिक्षण घेण्याचा होता. शासनाच्या निर्देशाप्रमाणे कळंबोली येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यासंकुल आज विद्यार्थ्यांसाठी खुले झाले. शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा किलबिलाट सुरु झाला. शाळेची घंटा वाजवणारे शिपाई वर्ग ही फारच खूश होते. तब्बल दोन वर्षानंतर शाळेची घंटा वाजवण्याचा मान आज शिपाई वर्गाला मिळणार होता. शाळेने ही शासकीय नियमानुसार असणारे सर्व सोपस्कार पूर्ण करून कोरोना नियमांचे पालन करून विद्यार्थ्यांची शाळा आज प्रथमच भरवली गेली. विद्यालयात विद्यार्थ्यांची उपस्थिती ही आज लक्षणीय होती. विद्यालयात येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन व नमस्कार करून त्यांचे स्वागत करण्यात आले. बऱ्याच मोठ्या कालावधीनंतर शाळा भरल्या ने शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी ही खूप आनंदी दिसत होते. शाळा सुरू झाल्याने समाधान शिक्षकांनी व्यक्त केले. मोठ्या कालावधीनंतर प्रथम शाळा सुरू झाल्याने विद्यार्थी वर्ग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरही आनंद ओसांडून वाहत असल्याचे दिसून आले. विद्यालयात मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू भाषेतून शिक्षण दिले जाते .

आठवीच्या पुढील वर्ग सुरू झाल्याने बहुतांशी विद्यार्थ्यांनी हजेरी लावून आपला आनंद व्यक्त केला. विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र बाजीराव पालवे म्हणाले की आज शासनाचे सर्व कायदे व नियम पाळून शाळा सुरू केली आहे. विद्यालय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांची आरोग्याची काळजी घेण्याचे ही आव्हान आमच्यासमोर आहे. आम्ही ती सर्व उपाययोजना करून विद्यार्थ्यांना ज्ञानदान देण्याचे काम मोठ्या जबाबदारीने पार पडून माझी शाळा माझे विद्यार्थी आणि माझी जबाबदारी हे ब्रीदवाक्य आम्ही सत्यात उतरवून कोरोनाला हरवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## संक्षिप्त...

### आर्यन खानसह तिघांना ७ ऑक्टोबरपर्यंत एनसीबी कोठडी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई – एनसीबीने शनिवारी रात्री रेव्ह पार्टीवर केलेल्या कारवाईत बॉलीवूड सुपरस्टार शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान याला अटक करण्यात आलं असून त्याच्यासह इतर दोघांना ७ ऑक्टोबरपर्यंत एनसीबी कोठडी सुनावण्यात आली. आर्यन खान, अरबाज मर्चंट आणि मुनमुन धमेचा या तिघांच्या तीन रात्री एनसीबी कोठडीत असणार आहेत.

आर्यनकडे ड्रग्ज सापडलं नाही. तसेच त्याला पाहुणा म्हणून पार्टीत नेलं होतं, आर्यनची बाजू मांडणारे वकील सतीश मानेशिंदे यांचा कोर्टात दावा केला तर अरबाजकडे ६ ग्रॅम चरस सापडलं असा एनसीबीच्या वकिलांनी कोर्टात दावा केला. कोर्टात सुनावणीदरम्यान क्रूझ ड्रग्ज पार्टीचं आंतरराष्ट्रीय कनेक्शन असल्याचा एनसीबीकडून दावा करण्यात आला, त्याबाबतच्या तपासासाठी ११ ऑक्टोबरपर्यंत कोठडी मिळावी अशी मागणी एनसीबीने केली होती. आर्यनच्या चॅटमध्ये धक्कादायक माहिती मिळाल्याचा एनसीबीने दावा केला आहे.

# जेएनपीटी विस्थापित हनुमान कोळीवाडा गावच्या विविध समस्या प्रलंबितच

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : कोरोनाच्या महामारीमुळे शासनाने तब्बल दोन वर्षे ग्रामसभेसाठी परवानगी दिली नसल्यामुळे तब्बल दोन वर्षातुन उरण तालुक्यातील जेएनपीटी विस्थापित हनुमान कोळीवाडा येथील हनुमान कोळीवाडा या ग्रामपंचायत मार्फत महात्मा गांधी जयंती साजरी करुन ग्रामसभेचे रितसर आयोजन करण्यात आले.ग्रामसभेला गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दाखवली. गावातील महिला आणि पुरुष यांची ३०० ते ४०० अशी लोकसंख्या उपस्थिती होते. या ग्रामसभेत ग्रामपंचायतचे ग्रामसेवक यांनी ग्रामसभेचा अजेंठा वाचून रितसर सुरुवात केली.सदरच्या ग्रामसभेत काही महत्वाचे ठराव ग्रामस्थांची मंजूरी घेऊनच करण्यात आले.

उरण बायपाससाठी ग्रामपंचायत मधून ठराव मागवण्यात आला असून उरण बायपास रोडच्यामुळे मच्छिमारांचा व्यवसाय बंद पडेल. मच्छिमार बाधीत होतील तसेच पारंपारिक मच्छिमार आदिवासी जमातीत येत असून तेथील कांदळवन उरण रोड बायपास मुळे नष्ट होईल.कांदळवनामुळे मच्छिमार बांधवांना रोजीरोटी मिळत आहे. बायपास मुळे सर्वावर बेकरीची कुऱ्हाड कोसळणार आहे.तसेच उरण रोड बायपास करण्याआधी सर्व मच्छिमारांची नुकसान भरपाई देऊन त्यांचे अगोदर पूनर्वसन करा तेव्हाच उरण रोड बायपास करावा. अशी मागणी यावेळी करण्यात आली तसा ग्रामसेवक यांनी ठराव घ्यावा असे ग्रामस्थांनी सांगितले.ग्रामसभेत शासनाने हर घर पाणी योजना घेण्यासाठी सांगितले हा

.../२



# राहिलेल्या अडीच वर्षासाठी शिवसेनेने भाजपा बरोबर येण्याचा विचार करावा : रामदास आठवले




**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली नगरपालिकेच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ब्रॉन्झ धातूच्या पुतळ्याचे अनावरण प्रसंगी केंद्रीय सामजिक न्याय मंत्री रामदास आठवले सोमवारी खोपोलीत आले होते. या उदघाटन सोहळ्यानंतर आपले विचार व्यक्त करताना आठवले यांनी म्हटले कि प्रबोधनकार ठाकरे आणि डॉ. बाबासाहेबांचे चांगले संबंध होते तसे उद्धव ठाकरे यांचे आणि माझे चांगले संबंध आहेत त्यांना आवाहन आहे कि आपण आता उरलेले अडीच वर्षे भाजपा बरोबर या. त्यांनी कवितेच्या माध्यमातून खोपोली च्या आठवणींना उजाळा देत सांगितले कि माझ्या स्मरणातुन खोपोली कधीच जाणार नाही, सामाजिक व राजकीय चळवळ उभी करताना खोपोली करांनी मला भक्कम साथ दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या अनावरण सोहळ्याने मी भारावून गेलो आहे असे सांगून नगरपालिकेच्या नगराध्यक्षा व सर्व नगरसेवकांचे कौतुक केले.

खोपोलीत आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण केंद्रीय राज्यमंत्री तथा रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांच्या हस्ते झाले. त्यांच्या समवेत या सोहळ्यास खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, पनवेल चे उपमहापौर तथा रिपाइंचे नेते जगदीश गायकवाड, तहसीलदार आयुब तांबोळी, माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर आदी मान्यवर उपस्थित होते. याच ठिकाणी ३० वर्षांपूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण झाले होते तेव्हा ही आठवले उपस्थित होते तेव्हा ते राज्याचे मंत्री होते. उपनागराध्यक्षा विनिता कांबळे यांनी प्रास्ताविक केले त्यानंतर मान्यवरांची भाषणे झाली व प्रमुख भाषण करताना आठवलेंनी कवितांवर कविता सादर करीत उपस्थितांची मने जिंकली.

व्यासपीठावर सेनेचे खासदार व आमदार असल्याने

.../२

# पनवेल कोळीवाडा, उरण नाका परिसरात विजेचा खेळखंडोबा

## महावितरणचा महाभोंगळ कारभार; नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील कोळीवाडा आणि उरण नाका परिसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असून नागरिक त्रस्त झाले आहेत. महावितरणने वेळीच आपला कारभार सुधारला नाही, तर नागरिक आंदोलन करण्याच्या पावित्र्यात आहेत.

पनवेलमधील उरण नाका आणि कोळीवाड्यातील विजेची परिस्थिती सध्या ग्रामीण भागाला लाजवेल अशी आहे. येथील वीजपुरवठा दिवस, रात्री कधीही अचानकपणे खंडित होत पडतो. लोक कामावरून दमून भागून घरी आल्यावर झोपायला गेल्यावर नेमकी लाईट जाते. रात्री–अपरात्री लाईट जात असल्याने झोपेचे तीनतेरा होतात. हल्ली कोरोना आणि अन्य साथरोगांचा प्रादुर्भाव असल्याने अनेक घरांमध्ये रुग्ण आहेत. त्यांना सर्वाधिक त्रास होतो. याशिवाय वृद्ध, लहान मुलेही विजेविना अस्वस्थ होऊन जातात.

रात्रीच्या सुमारास वीजपुरवठा खंडित झाल्यावर हाकेच्या अंतरावर असलेल्या महावितरण कार्यालयाच्या संपर्क क्रमांकावर फोन केला असता, समोरून प्रतिसाद देण्याचे सौजन्य दाखविले जात नाही. थेट कार्यालयात जाऊन चौकशी करण्यास गेल्यावर बहुतांश वेळी तिथे कुणीही अधिकारी अथवा कर्मचारी उपलब्ध नसतात. तेथील लाईट्स मात्र सुरू असतात. त्यामुळे ही मंडळी आतमध्ये झोपा काढत तर नाही ना, अशी नागरिकांमध्ये शंका आहे.

ऑक्टोबर हीटचा त्रास नागरिकांना जाणवू लागला आहे. रात्रीच्या तापमानातही कमालीची वाढ झालेली आहे. अशा वेळी वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. महावितरणने वरवरची मलमपट्टी न करता यावर ठोस व कायमस्वरूपी मार्ग काढावा; अन्यथा मोर्चा काढून जाब विचारला जाईल, असा इशारा उरण नाका आणि कोळीवाड्यातील नागरिकांनी महावितरणला दिला आहे.



# रायगडमध्ये आता कामगारांसाठी प्रहार

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

अपक्ष आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेच्या माध्यमातून कामगार संघटनेचे पदार्पण रायगड मध्ये प्रथमच करण्यात आली आहे पनवेल मधील तळोजा औद्योगिक वसाहतीमधील फ्लेमिंगो फार्मसिटीकल कंपनीत प्रहार कामगार संघटनेचे पहिले युनिट स्थापन करण्यात आले असून बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेला या कंपनीतील कामगारांनी पसंती दिली आहे आहे.

सोमवारी कामगारांच्या उपस्थितीत कामगार संघटनेच्या नामफलकाचा उद्घाटन समारंभ पार पडला. यावेळी प्रमुख उपस्थिती स्थानिक नगरसेवक विजय पाटिल, प्रहार कामगार संघटनेचे अध्यक्ष ॲड.मनोज टेकडे, उपाध्यक्ष ॲड.अजय तापकीर, सेक्रेटरी संतोष गवस, खजिनदार चंद्रकांत उत्तेकर, नवी मुंबई शहराध्यक्ष प्रवीण खेडकर, युनिट अध्यक्ष चंद्रकांत पाटिल, उपाध्यक्ष कृष्णा पाटिल, सचिव मनोज पाटिल, कार्यकारिणी सदस्य जितेंद्र पाटिल, अर्जुन पाटिल, महेंद्र पाटिल आदी पदाधिकारी उपस्थित होते. प्रहार कामगार संघटना कामगारांच्या सदैव हितासाठी झटणारे असून कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी लढा देण्याचा निर्धारही संघटनेचे सचिव संतोष गवस यांनी व्यक्त केला आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांची कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्चला सदिच्छा भेट



**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे जेष्ठ सदस्य व थोर देणगीदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेच्या १०२ व्या वर्धापन दिनानिमित्त आज (दि. ०४) वर्ये (सातारा) येथील कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्चला सदिच्छा भेट दिली. त्यांच्या शुभ हस्ते अंतीम वर्षातील कॅम्पस इंटरव्ह्यू द्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या बॅनरचे प्रकाशन करण्यात आले.

कोरोना काळात इन्स्टिट्यूट ने केलेल्या कामाचे यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले. तसेच गतवर्षी संशोधन व पेटंट नोंदणी केल्याबद्दल डॉ सारंग भोला यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले तसेच कॉपीराईट बद्दल डॉ राजेंद्र कुंभार व संशोधन पेपर प्रकाशित केल्याबद्दल डॉ. शिवराज निकम तसेच संशोधन, कॉपीराईट व पेटंट नोंदणीसाठी सहकारी प्राध्यापकांना प्रेरणा व प्रोत्साहन केल्याबद्दल इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ बापूसाहेब सावंत यांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचबरबर त्यांनी इन्स्टिट्यूटच्या सर्व शिक्षकांशी चर्चा करून मार्गदर्शन केले व समाधान व्यक्त केले व इन्स्टिट्यूटच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रयत शिक्षण संस्थेचा १०२ वा वर्धापन दिन साजरा

दै.रायगड नगरी । सातारा

रयत शिक्षण संस्थेचा १०२ वा वर्धापन दिन सातारा येथील यशवंतराव चव्हाण इन्सटीट्युट ऑफ सायन्स या महाविद्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत, संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.हेमंत कटरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



रयत शिक्षण संस्थेच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करताना ते पुढे म्हणाले की ,''केवळ ३० रुपये व ४ विद्यार्थी घेऊन सुरु झालेल्या रयत शिक्षण संस्थेत आज साडेचार लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.केजी पासून पीजी पर्यंत शिक्षण देत ग्रामीण भागात ज्ञानदान करणारी ही संस्था केवळ शिक्षण देत नसून ती विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबवीत आहे.विविध संस्थाशी सामंजस्य करार करून ती विद्यार्थ्याचे भवितव्य घडवीत आहे .ती विद्यार्थ्यांना रस्त्यावर सोडत नाही.हीच जाणीव ठेवून रयतचा कारभार होत राहिला तर रयतचे ग्रामीण विद्यापीठ पाहण्यासाठी परदेशी शिक्षण तज्ञ इथे येतील असा आशा–वाद त्यांनी व्यक्त केला.महात्मा फुले,डॉ. आबेंडकर याचेसाठी जशी चरित्र लेखन साधनसमिती स्थापित करण्यात आली तशीच कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या नावाने चरित्र लेखन समिती स्थापित करून त्यांच्या चरित्राचे खंड विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध व्हावेत यासाठी मी स्वतः प्रयत्न करेन, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासूनचा आढावा घेतला.रयत शिक्षण संस्थेच्या जोपासनेत प्रबोधनकार ठाकरे यांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेच्या स्थापनेच्या वेळी झालेल्या सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनात प्रबोधनकार ठाकरे होते.प्रबोधनकार आणि कर्मवीर यांचे जिव्हाळ्याचे संबध होते.कर्मवीरांनी अनेकदा शिवजयंतीला व्याख्यान देण्यासाठी त्यांना साताऱ्यात आणले होते.महात्मा गांधी यांची भेट घेऊन रयत शिक्षण संस्थेचे काम हे कर्मवीर भाऊराव पाटील कसे तळमळीने करतात हे त्यांनी गांधीजीना पटवून दिले होते .त्यामुळे हरिजन सेवक संघाच्या निधीतून दर वर्षाला पाचशे रुपये रयत शिक्षण संस्थेला मिळत होते असेही ते म्हणाले.

रयत शिक्षण संस्थेला महाराष्ट्र शासनाचे मोठे सहकार्य असल्याचे सांगून आज जागतिकीकरणाच्या काळात ज्या स्पर्धा निर्माण झाल्या आहेत ते लक्षात घेऊन रयत पुढच्या काळात स्वायत्त महाविद्यालये वाढवणार आहे .त्यासाठी शासनाने संस्थेला सहकार्य करावे. रयतच्या ४२ महाविद्यालयासाठी स्वतंत्र विद्यापीठ द्यावे. काळानुसार बदल करायचे असतील तर खाजगी शिक्षण संस्थाशी आपली स्पर्धा वाढणार आहे.आम्हाला शासनाने संसाधने उपलब्ध करून दिली तर ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्यासाठी रयत प्रयत्न करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .

# भाजपची तळा शहर कार्यकारिणी जाहीर

दै.रायगड नगरी । किशोर पितळे

**तळा** : भारतीय जनता पार्टीच्या तळा तालुका महिला अध्यक्षपदी प्रमिला ए.चोरगे महिला शहर अध्यक्षपदी अमृता टिळक तर सचिवपदी किशोरी श्रोत्री यांची नियुक्ती करण्यात आली आहे. असून शहरातील महिला मतदार आपल्याकडे वळविण्यासाठी पक्षाकडून शहरातील महिला पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

भाजपने नियुक्ती केलेल्या दोन्ही महिला पदाधिकारी या उच्च शिक्षित असून त्यांच्या अनुभवाचा पक्षाला नक्कीच फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे.शहरातील महिलांचे असणारे प्रश्न व समस्या या पक्षाच्या माध्यमातून सोडवून शहरातील भाजप पक्ष वाढीसाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी नवनियुक्त महिलाअध्यक्षा व सचिव यांनी प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.या प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश सचिव रवीभाऊ मुंढे,तालुका अध्यक्ष अँड.निलेश रातवडकर,महिला मोर्चा दक्षिण जिल्हाध्यक्षाहेमलता मानकर मॅडम यांच्याहस्ते प्रमिला ए. चोरगे यांची महिला मोर्चा तालुकाध्यक्षापदी निवड करण्यात आली व अनिता महेंद्र शिगवण,सुनिता मनोहर चोरगे व श्रीम.शालिनी सांगळे यांची बुथ अध्यक्षा या पदी निवड करण्यात आली.भोईरवाडी येथील संदीप कदम यांनी ३ऑक्टो२१ रोजी दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अँड महेशजी मोहिते व गोरेगांव येथीलजेष्ठ कार्यकर्ते नाना महाले यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.यावेळी नगराध्यक्षा रेशमाताई मुंढे तालुका सरचिटणीस विलास ठसाळ, शहर अध्यक्ष सुधीर तळकर,सांस्कृतिक सेल तालुकाध्यक्ष सुभाष मुंढे युवा मोर्चा तालुका सचिव अंकुश सालेकर, युवा मोर्चा शहरअध्यक्ष सुयोग बारटक्के, शक्तीप्रमुख मोरेश्वर गोरीवले, बूथ अध्यक्ष नितीन शिगवण, मुंढ्याची वाडी भोईरवाडी ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ,यांसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.तळा नगरपंचायत निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने कंबर कसली असून नवीन चेहऱ्यांना सामावून घेतले असल्याचे बोलले जात आहे.


श्रीमती.चिर्द्रे सो.

वकील : ए.के.साहू

**जाहीर नोटीस**

वाशी येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

ओ.एम.ए.क्र.९३/२०२०
नि.नं.०५
ने.ता.२२/१०/२०२१

श्री.भागवत हरिहर सिंग
वय : ५४ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.ए–४०२, प्लॉट नं.५४, सेक्टर ४४ ए,
सिवूड पश्चिम, नेरुळ, नवी मुंबई–४००७०६ अर्जदार

विरुद्ध

नवी मुंबई महानगरपालिका
आरोग्य खाते (जन्म मृत्यू विभाग)
नेरुळ, नवी मुंबई, ता. व जि.ठाणे सामनेवाले

वरील अर्जदार यांची आई कै.मालती हरिहर सिंग यांचा मृत्यू दि.१८/०५/२०१७ रोजी ए–४०२, प्लॉट नं.५४, सेक्टर ४४ ए, सीवूड पश्चिम, नेरुळ, नवी मुंबई–४००७०६ येथील राहत्या घरी झालेला आहे. सदर मयताचे मृत्यूची नोंद त्यावेळी नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य खाते (जन्म मृत्यू विभाग) नवी मुंबई, ता. व जि.ठाणे यांच्या कार्यालयात झालेली नसल्याने अर्जदाराने मयताचे मृत्यू दाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मृत्यूदाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने लेखी हरकत ही जाहीर नोटीस ३० दिवसाच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मृत्यू दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

दि.०४/१०/२०२१

सही/– क.लिपीक सिव्हील कोर्ट, वाशी | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक सिव्हील कोर्ट, वाशी



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेल्या मिळकती ह्या श्री.पांडुरंग रामचंद्र मावकर, श्री.खंडू रामचंद्र मावकर, श्री.रामभाऊ नथु मावकर, श्री.लक्ष्मण नथु मावकर सर्व रा.मु.पो.दहिवली, ता.मावळ, जि.पुणे यांच्या सामाईक मालकीच्या नावे आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : दहिवली, ता.मावळ, जि.पुणे**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| ६९ | – | ०१.००.५० | ३.०६ |

सदर वर जमीन मिळकतीवर ०१.००.५० हे.आर.पॉ. जमीन मिळकतीत विकसन कराराचा विषय

आमचे अशिल श्री.अशोक बळीराम गांगरे प्रोप्रा.ओम कंन्स्ट्रक्शन, रा.पनवेल, जि.रायगड यांनी वर नमूद केलेली मिळकत ''विकसन कराराद्वारे'' ६०:४० टक्के याप्रमाणे वाटून घेण्याच्या तत्वावर सदरहू जमीन मिळकत विकसित करण्यासाठी द्यावी असा प्रस्ताव वर नमूद केलेल्या मुळ मालकांना दिलेला आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरविलेला विकसन करार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०४/१०/२०२१

सही/–
अॅड.दिपक म. ठाकूर
गाळा नं.९, पवन अपार्टमेंट, न्यू कोर्ट बिल्डींगच्या बाजूला, अशोक बागेसमोर, लोखंडीपाडा, पनवेल–४१०२०६
मो.नं. ९८१९८८१७०४


# अनिष पाटील व गोपाळ म्हात्रे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

दै.रायगड नगरी । उरण

मुंबई येथे मराठी पत्रकार हॉल, आझाद मैदान येथे अमरदीप बालविकास फाउंडेशन व टिएमजी क्रिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय टि एम जी प्यारा माउंटन अचीव्हमेंट राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातून फक्त चाळीस युवा युवतीना सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये अनिष चंद्रहास पाटील व गोपाळ दिनकर म्हात्रे , सारडे – उरण यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

हा पुरस्कार वितरण करण्यासाठी अनेक दिग्गज व्यक्ती उपस्थित होते.अभिनेत्री प्रेमा ताई, डॉक्टर अमजद खान पठाण कर्करोग शास्त्रज्ञ, सुनिता ताई शिंदे राज्य उपाध्यक्ष महाराष्ट्र एनसीपी, शिंदे राज्य उपाध्यक्ष महाराष्ट्र एनसीपी, ज्योती ठाकरे आर्थिक विकास महामंडळ अध्यक्षा ज्योती ठाकरे ,अभिनेता प्रदीप पटवर्धन,अभिनेत्री नयन पवार,फिल्म सेंसर बोर्ड सदस्य इत्यादी दिग्गज मंडळी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आला.


मे.मुजावर सो

अॅड.महेश ज. पाटील
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१३३९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/११/२०२१

कै.शाहिन महेंद्र याग्निक मयतचे वारस
श्री.केदार महेंद्र याग्निक
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
रा.सी/२०२, हार्मोण्य अपार्टमेंट, यशवंत विवा टाऊनशिप,
वसई नालासोपारा लिंक रोड, डी–मार्ट समोर,
वसई ईस्ट, वसई, पालघर, महाराष्ट्र–४०१२०८ अर्जदार

विरुद्ध

श्री.महेंद्र गुनवंतराई याग्निक
वय : ७८ वर्षे, धंदा : नोकरी
रा.केएल–५, बिल्डींग नं.३८, रुम नं.६, सेक्टर ३ ई,
कळंबोली नोड, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार हे कै.शाहिन महेंद्र याग्निक यांचा मुलगा असून सामनेवाला हे पती आहेत. कै.शाहिन महेंद्र याग्निक यांचे दि.१४/०३/२०१२ रोजी मुंबई येथे निधन झाले असून श्री.केदार महेंद्र याग्निक ह्यांनी कै.शाहिन महेंद्र याग्निक यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**केएल–५, बिल्डींग नं.३८, रुम/चाळ नं.६,**
**पहिला मजला, कळंबोली नोड, कळंबोली,**
**ता.पनवेल, जि.रायगड.**
**सदर सदनिकेची एकूण किंमत रु.१,४०,०००/–**
**(अक्षरी रक्कम रुपये एक लाख चाळीस हजार मात्र)**

वरील मिळकत ही कै.शाहिन महेंद्र याग्निक यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्री.केदार महेंद्र याग्निक व सामनेवाला श्री.महेंद्र गुनवंतराई याग्निक हे कै.शाहिन महेंद्र याग्निक यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.केदार महेंद्र याग्निक यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.शाहिन महेंद्र याग्निक यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०४/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.राव साहेब
प्रो.जमा रु.५०/– अर्जदारतर्फे वकील अॅड.शुभांगी केदार लाड

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३०५/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.१७/११/२०२१

कै.विलास दामोदर पाटील मयत यांचे वारस
१) संगीता विलास पाटील
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
२) गौरव विलास पाटील
वय : २५ वर्षे, धंदा : काहीनाही
३) रिया विलास पाटील
वय : २२ वर्षे, धंदा : काहीनाही
अर्जदार क्र.१ ते ३ रा.फ्लॅट नं.३०३, श्री स्वामी समर्थ को.ऑप.हौ.सो., महात्मा फुले रोड, डॉ.बुधकर क्लिनीक जवळ, पनवेल, रायगड महाराष्ट्र ४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै.विलास दामोदर पाटील यांचा मृत्यू दि.०६/०५/२०२१ रोजी एसटी. जॉर्ज, गर्व्हमेंट हॉस्पिटल महाराष्ट्र येथे झालेला असून कै.विलास दामोदर पाटील हे हयात असताना त्यांच्या मृत्यू समयी त्यांचे मालकी हक्कात स्वसंपादीत मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निवासी सदनिका आणि मौजे : तरणखोप, ता.पेण, जि.रायगड येथे जमीन मिळकत असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**अ) निवासी मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| बिल्डींगचे / सोसायटीचे नाव | Flat No. निवासी सदनिका क्र. | Floor मजला | क्षेत्र चौ.फूट |
|---|---|---|---|
| श्री स्वामी समर्थ को.ऑप.हौ.सो. | ३०३ | तिसरा | ४८० चौ.फुट कारपेट एरिया |

**ब) निवासी मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तरणखोप, ता.पेण, जि.रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २९ | २ अ २ | ०–०५–४७ | १०.९४ |

वरील निवासी सदनिके संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणे करिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.४/१०/२०२१ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्याने दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



## निविदा सूचना क्र.१० सन २०२१–२०२२
## सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग

खालील कामाच्या बी–१ निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग दूरध्वनी क्रमांक २२२०८४ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत (पंजीकृत) कंत्राटदारांकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अलिबाग यांच्या संकेत स्थळावर दि.०६/१०/२०२१ ते १३/१०/२०२१ पर्यंत १०.०० ते १८.०० वाजेपर्यंत ऑनलाईन (www.mahapwd.com) वर उपलब्ध आहे. कार्यकारी अभियंता हे ठेकेदाराने भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा ऑफलाईन पद्धतीने दि.१८/१०/२०२१ रोजी १०.०० ते ६.०० वाजेपर्यंत स्वीकारतील आणि दि.२०/१०/२०२१ रोजी सकाळी ३.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसाऱ्याची रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी महिने | निविदेच्या नमुन्याचा प्रकार कोऱ्या निविदा नमुन्यांची किंमत (रुपये) | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खरोशी धरणाचीवाडी येथे साकवाचे बांधकाम करणे, ता.पेण, जि.रायगड | रु.६,०७,७६०/– | ७,०००/– | ०३ महिने | ब–१ रु.५६०/– | वर्ग ७ व वरील |
| २ | शेडाशी येथील मयाणी समाज मंदिराभोवती संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे, ता.पेण, जि.रायगड | रु.४,१२,४७७/– | ५,०००/– | ०३ महिने | ब–१ रु.५६०/– | वर्ग ८ वरील |
| ३ | वाशिवली येथे वसंत व्ही.तटकरे यांचे घर ते नदीपर्यंतचा रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे, ता.पेण, जि.रायगड | रु.४,२७,३५९/– | ५,०००/– | ०३ महिने | ब–१ रु.५६०/– | वर्ग ८ वरील |
| ४ | वाशिवली येथे जयेश दळवी यांचे घर ते संजय हादगे यांचे घरापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे, ता.पेण, जि.रायगड | रु.४,२७,३५९/– | ५,०००/– | ०३ महिने | ब–१ रु.५६०/– | वर्ग ८ वरील |
| ५ | ग्रामपंचायत गागोदे येथील साधुराम कोंडू पाटील यांचे घर ते अशोक कृष्णा पाटील यांचे घरापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे, ता.पेण, जि.रायगड | रु.४,२७,१४४/– | ५,०००/– | ०३ महिने | ब–१ रु.५६०/– | वर्ग ८ वरील |
| ६ | ग्रामपंचायत गागोदे येथील दिलीप एम.घोंगे यांचे घर ते मंदिरा पर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे, ता.पेण, जि.रायगड | रु.४,२७,१४४/– | ५,०००/– | ०३ महिने | ब–१ रु.५६०/– | वर्ग ८ वरील |
| ७ | गागोदे खुर्द येथे सामाजिक सभागृह बांधणे,ता.पेण, जि.रायगड | रु.४,३०,७६७/– | ५,०००/– | ०३ महिने | ब–१ रु.५६०/– | वर्ग ८ वरील |
| ८ | मायणी येथे स्मशानभूमी शेडचे बांधकाम करणे, ता.पेण, जि.रायगड | रु.४,२०,८४८/– | ५,०००/– | ०३ महिने | ब–१ रु.५६०/– | वर्ग ८ वरील |

टीप :– १) तपशिलवार निविदा सूचना कार्यकारी अभियंता व अधिक्षक अभियंता यांचे कार्यालयीन फलकावर पहावयास मिळेल. तसेच कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास निविदा सुचनेची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

२) कोरी निविदा संच विक्री http//www.mahapwd.com या संकेत स्थळावर ऑनलाईन उपलब्ध आहे.

३) इतर अटी व शर्ती निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची बी–१ निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहे.

४) सर्व पात्र / इच्छुक निविदा कारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई–निविदा प्रणालीच्या http//www.mahapwd.com या Portal वर enrolled करणे आवश्यक आहे.

जा.क्र. : अवि/लेशा/निविदा/ /२०२१
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
अलिबाग सा.बां.विभाग, अलिबाग

सही/–
(ज.ई.सुखदेवे)
कार्यकारी अभियंता
अलिबाग (सा.बां.) विभाग,
अलिबाग

क्र.जिमाका/राअ/जाहि/११४/२०२१–२२


पृष्ठ क्र.१ वरुन...

## जेएनपीटी विस्थापित हनुमान कोळीवाडा गावच्या विविध समस्या प्रलंबितच

ठराव सर्वानुमते मंजुर केला. तसेच गावातील काही नागरिकांनी पाणी बिल थकवले आहे.

एमआयडीसीची तब्बल ३४ लाख रुपये थकबाकी असुन लोकांनी त्वरित थकबाकी भरावी अन्यता थकबाकी दारांची यादी लोकआदालत मध्ये देण्यात येईल. असा सर्व ग्रामस्थांच्या वतीने ठराव घेण्यात आला.गावात वनहक्क समिती स्थापन करण्यात आली.

गावातील सर्व ग्रामस्थांकडून ग्रामपंचायतचे सदस्य मासिक सभा आणि ग्रामसभेला कधीच उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या वर ग्रामपंचायत मार्फत कारवाई करुन त्यांचे सदस्य पद रद्द करावे असा ठराव घेण्यात आला.तसेच माजी सरपंच जयवंत कोळी आणि जेएनपीटी चे कामगार यशवंत कोळी यांनी पूनर्वसनाच्या कामात सतत गैरव्यवहार केल्यामुळे त्यांच्यावर ग्रामपंचायत मार्फत कारवाई करण्यात यावी असा ठराव घेण्यात आला.

यावेळी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचे अध्यक्ष सरपंच परमानंद कोळी, ग्रामसेविका सुप्रिया घरत, ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष सुरेश कोळी, उपाध्यक्ष मंगेश कोळी, बहुजन समाज पार्टीचे उरण तालुका महासचिव नरेश कोळी, मच्छिमार सोसायटीचे अध्यक्ष वैभव कोळी, अनिल कोळी,चंद्रकांत कोळी, राष्ट्रवादीचे विद्यार्थी संघटना उरण तालुका अध्यक्ष निखिल कोळी, प्रशांत कोळी, अनंत कोळी, अमित कोळी, निखिल कोळी,अक्षय कोळी, महिला कार्यकर्त्या नम्रता कोळी, उज्वला कोळी, राणी कोळी, शर्मिला कोळी, वनिता कोळी, अंकल ग्रुप, एकता ग्रुपचे पदाधिकारी सदस्य आणि गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.ग्रामसभेत जमलेल्या सर्व ग्रामस्थांचे ग्रामपंचायत तर्फे सरपंचानी मनपूर्वक आभार मानले.

## शिवसेनेने भाजपा बरोबर येण्याचा विचार करावा : रामदास आठवले

आठवले सेनेबाबत बोलणार नाहीत असे कसे होणार. भविष्याची भविष्यवाणी त्यांनी बोलून दाखवली व स्व. बाळासाहेब ठाकरेंचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुन्हा एकत्र येऊ असे सूचक वक्तव्य केले. कार्यक्रम संपन्न झाल्यावर पत्रकारांशी बोलताना रामदास आठवले म्हणाले की २०२४ मध्ये भविष्यात सेना, भाजप, आरपीआय च सरकार राज्यात येईल , उद्धव ठाकरे पुन्हा एकदा बँक टू पॅव्हेलीयन होतील त्यांनी एनडीए मध्ये सामील व्हावे असे ते म्हणाले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## इलेक्ट्रीक पोल फिटींगचे साहित्य चोरणाऱ्या महिला पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इलेक्ट्रीक पोल फिटींगचे साहित्य चोरणाऱ्या चार पैकी तीन महिलांना पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

इलेक्ट्रीक कॉन्ट्रक्टर दर्शन पाटील यांचे जी.आय. चे एल.टी.स्टे. क्लॅम्प जॉईंट लग ॲल्युमिनिअम, यु क्लॅम्प असा ऐवज त्यांनी बोरले गावाच्या हद्दीत त्यांच्या घरासमोरील मोकळ्या जागेत ठेवला असताना आरोपी नेहा काळे (२७), अर्चना भोसले (३२), पार्वती जाधव (४२), कृष्णा भाले (२७) यांनी आपसात संगनमत करून सदर माल चोरुन नेला. त्याची किंमत ११ हजार ५२५ रुपये इतकी होती. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करताच वपोनि रवींद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. (गुन्हे) अंकुश खेडकर, सपोनि पाळंदे, पो.उप.भरत पाटील आदींच्या पथकाने या गुन्ह्यातील तीन महिलांना ताब्यात घेतले आहे. यांच्या अटकेमुळे अजूनही काही चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## विक्रांत पाटील यांनी त्वरित सोडवली प्रभागातील विजेची समस्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रभागातील एका भागात आराधना सोसायटी समोरील विजेची केबल ब्रेक झाल्याने परिसरातील एक फेज बंद झाला होता.त्यामुळे सोसायटीचे पाण्याचे पंप आणि लिफ्ट ला होणारा वीजपुरवठा बंद झाला होता.या विषयाची माहिती मिळताच नगरसेवक विक्रांत पाटील यांनी त्वरित महावितरण च्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून नागरिकांची पाण्याची गैरसोय होऊ नये म्हणून तात्पुरती सर्व्हिस वायर टाकून घेण्यास सांगितली.



यामुळें सोसायटिंच्या पाण्याची समस्या दूर झाली. त्यानंतर लगेच काम पूर्ण करून घेण्यास सांगितले. ब्रेक झालेली वायर कापून जोडून घेण्यात आली.प्रभागातील समस्या सोडवण्यासाठी नगरसेवक विक्रांत पाटील तत्परतेने पाऊले उचलतात त्याबद्दल नागरिकांनी समाधान केले आहे.

# कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण महाशिबिरात १ हजार लेकींचे लसीकरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सेवा व समर्पण अभियान अंतर्गत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सीकेटी महाविद्यालयात पार पडलेल्या गर्भाशय मुखाच्या कॅन्सरवर प्रतिबंधात्मक लसीकरण महाशिबिरात १ हजार पनवेलच्या लेकींचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट पूर्ण होत या महाशिबीराला उदंड प्रतिसाद लाभला.



दोन दिवसीय या महाशिबिराचे उद्घाटन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्या हस्ते व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली (दि. ०२) आयोजित करण्यात आले होते. यावेळी या शिबिराच्या उत्तम नियोजनाबद्दल नामदार भारती पवार यांनी भरभरून कौतुक केले होते. गर्भाशय मुखाच्या कॅन्सरची तपासणी करण्यासाठी एचप-ीव्ही नामक चाचणी करावी लागते आणि ही चाचणी महागडी असल्याने महिला याकडे दुर्लक्ष करतात. जागतिक आरोग्य संघटना (थक्ज)च्या अहवालानुसार गर्भाशयमुखाचा कॅन्सर हा एचपीव्हीच्या 'हाय रिस्क' प्रकारच्या विषाणूमुळे होतो. महिलांमध्ये सर्वाधिक प्रमाण असलेल्या कॅन्सरमध्ये या कॅन्सरचा चौथा क्रमांक लागतो. महिलांमध्ये धडकी भरवणारा सर्व्हिकल म्हणजेच गर्भाशय मुखाचा कॅन्सर ही जगभर मोठी समस्या आहे. बाजारात या एका चाचणीसाठी सुमारे सात ते नऊ हजार रुपयांचा खर्च येतो. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या पुढाकाराने सेवा व समर्पण अभियान अंतर्गत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कॅन्सरच्या निर्मूलनासाठी या लसीकरण महाशिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रमाणे शिबिराच्या पहिल्या दिवशी ४४४ तर दुसऱ्या दिवशी ५५६ मुलींचे लसीकरण होऊन १ हजार मुलींना याचा लाभ मिळाला. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशन आणि महिला मोर्चाने विशेष मेहनत घेतली.

# पाष्टी येथे प्रांत अधिकारी अमित शेडगे यांनी केले ७/१२ चे वाटप आणि वाचन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून संगणकीकृत ७/१२ मोफत घरप-ोच करण्याच्या पाष्टी येथील कार्यक्रम प्रांताधिकारी अमित शेडगे यांच्या हस्ते संपन्न झाला. पाष्टी, मोरवणे, वरनाट पंचक्रोशीतील बागायतदार, शेतकऱ्याना सातबारा वाटप केले. याप्रसंगी तह-सीलदार समीर घारे, जिल्हा कृषी सभापती बबन मनवे,सभापती छाया म्हात्रे, माजी सभापती उज्वला सावंत, समीर बनकर, सरपंच चंदू पवार, उपसभापती संदिप चाचले, आयोजक मंडळ अधिकारी खामगांव एस. के. शहा, तलाठी जितेंद्र शेळके, कोतवाल जागृती दिवेकर, कृपाली धुमाळ, पं. स. सदस्य मधुकर गायकर, गाव अध्यक्ष शांताराम कांबळे, राजाराम धुमाळ, सचिन दिवेकर, जीवन लाड, प्रकाश लाड, खजिनदार प्रकाश धुमाळ, महिला अध्यक्षा सुवर्णा धुमाळ, सुनिल भोजने, शांताराम खैरे आणि ग्रामस्थ-महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महसूल विभागाच्या पारदर्शक माध्यमातून लोकाभिमुख काम होत असल्याचे प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी सांगून प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या जागेचा ७/१२ मिळणे अत्यावश्यक असून ७/१२ ला शेतकरी जीवनात अनन्य साधारण महत्व असल्याचे अमित शेडगे यांनी सांगितले. महसूल व शेतकरी यांचे जिव्हाळ्याचे नाते वाढत आहे.महसूल विभागाच्या ई -पिक पाणी, ई-महाभूमी, ई- फेरफार अशा अनेक प्रकारच्या योजना आहेत. तसेच ७/१२ वाटप करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य ठरले असून म्हसळा तालुक्यामध्ये ४६१३८ ७/१२ व २८९२४ खातेदारांना मोफत ७/१२ वाटप करण्यात येईल असेही अमित शेडगे यांनी सांगुन महसूल विभागातील तलाठी मंडळ अधिकारी हे प्रत्येक गा-वात जाऊन ७/१२ वाटप करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# मुरुड तालुका विधी सेवा समिती मार्फत कायदेविषयक शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । मुरुड**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राष्ट्रीय सेवा प्राधिकरण सर्वोच्च न्यायालय दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय मुंबई व रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार दि. ०२ ऑक्टोबर २०२१ ते १४ नोव्हेंबर २०२१ या कालावधीमध्ये भारतभर जागरूकता अभियान व पोहच या कार्यक्रमांतर्गत मुरुड तालुका विधी सेवा समितीतर्फे अध्यक्ष न्यायाधीश संदीप सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड नगरपरिषद येथे महिलांमध्ये जनजागृती करण्यासाठी कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले यावेळी वकील अजित चोगले यांनी स्त्रियांचे हक्क व भ्रूणहत्या प्रतिबंध याविषयी व वकील मृणाल खोत यांनी महिलांवरील अत्याचार प्रतिबंध याविषयी कायद्यांबाबत सखोल मार्गदर्शन केले याप्रसंगी मुरुड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा स्नेहा पाटील, सरकारी वकील संजय राठोड, न्यायालयीन कर्मचारी वर्ग तसेच महिलावर्ग मोठ्या संख्येत उपस्थित होते .



---

अर्जदाराचे वकील : ॲड.प्रिती जगदीश भारती

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१२८७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/१२/२०२१

१) श्री.शहाजी जयसिंग सातपुते
वय : ५८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) श्रीमती.मिना जयसिंग सातपुते
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
वरील १ व २ रा.सी-१६, बी.ए.आर.सी.
कॉलनी तक्षशिला, अणशुक्तीनगर, मुंबई ४०००९४
३) श्रीमती.मनिषा प्रवीण वायदंडे
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.रुम नं.२५७७, शांताराम पाटील नगर,
आंबिवली, कल्याण ४२११०२
४) सौ.नंदा देवीदास अवघडे
वय : ५४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.पी एल ६ ए १/१४, सेक्टर १४,
खांदा कॉलनी, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
५) श्रीमती.भाराती विजय खिलारे
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.२ रा.सी-१६, बी.ए.आर.सी.
कॉलनी तक्षशिला, अणशुक्तीनगर, मुंबई ४०००९४ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.इंदूबाई जयसिंग सातपुते यांचे दि.१०/१२/२०११ रोजी रा.सी-१६, बी.ए.आर.सी. कॉलनी, तक्षशिला, अणशुक्तीनगर, मुंबई ४०००९४ येथे राहत्या घरी निधन झाले आहे. अर्जदार हे कै.इंदूबाई जयसिंग सातपुते यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.इंदूबाई जयसिंग सातपुते ह्या हयातीत असताना त्यांचे नावे असलेल्या निवासी सदनिकांचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे :-

सदनिकेचे वर्णन

कै.इंदूबाई जयसिंग सातपुते या हयातीत असताना कै.इंदूबाई जयसिंग सातपुते यांनी अ) शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) यांनी तळमजला अधिक ३ असे पी.एल.६ ए टाईप इमारतींचे बांधकाम केलेले होते. शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) यांचेकडून सदर इमारतीमधील पी.एल.६ ए-१-३-१४ सेक्टर १४, क्षेत्रफळ ५४.०३ चौ.मी. बिल्टअप खांदा कॉलनी, नवीन पनवेल, जि.रायगड ४१०२०६ निवासी सदनिका विकत घेतलेली आहे. सदरचा करारनामा दि.०४/०३/१९९७ रोजी शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) व कै.इंदूबाई जयसिंग सातपुते यांचेमध्ये झालेला आहे.

ब) कै.इंदूबाई जयसिंग सातपुते ह्या हयातीत असताना कै.इंदूबाई जयसिंग सातपुते यांनी दि.०१/०१/२००९ रोजी मे.श्री ज्ञानेश्वर माऊली बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीर १) श्री.मच्छिंद्रनाथ नाथू झगडे, २) श्री.बाबासाहेब आसाराम ठोंबरे, ३) श्री.एकनाथ रघुनाथ भोपी, ४) श्री.मुकूंद शालिक म्हात्रे यांच्याकडून रजिस्टर करारनामाने गट क्र.८०/२, मौजे : विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड या मिळकतीवर बांधलेली श्री ज्ञानेश्वर माऊली को.ऑप.हौ.सो.लि. या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र.डी १९, डी विंग, क्षेत्रफळ ४०० चौ.फूट बिल्टअप ही निवासी सदनिका विकत घेतलेली आहे. सदरचा करारनामा अनु क्र.०००११/२००९ कडे मा.दुय्यम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयात दि.०१/०१/२००९ रोजी नोंदविलेला आहे.

वरील सदनिकेमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ ते ५ हे कै.इंदूबाई जयसिंग सातपुते यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.४/१०/२०२१ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

Shri.Rao Saheb

Adv. Sanjay K Kanade
Adv. Anil R. Nagdeve
Adv. Gaurav S. Kanade

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE
SENIOR DIVISION, PANVEL, AT PANVEL
CIVIL MISC. APPL. 1151/2021
Exh : 8/D
N.D. 20/10/2021

Late Mr.Suhas Mahadev Patil (Deceased)
1) Smt.Shobha Kashinath Patil alias
Shobha Suhas Patil
Age : 41 Yrs. Occupation : Service
2) Master. Purav Suhas Patil
Age : 10 Yrs. Occupation : Education
both residing at 3 A, 501,
Siddhachal Phase 6, Pokhran Road
No.2 Thane, Maharashtra 400610
3) Mrs. Minal Mahadev Patil
Age : 61 Yrs,. Occupation : Housewife
residing at Flat No.001, A Wing, Akansha
Avenue, Ground Floor, Old Thana Naka
Panvel, Tal.Panvel, Dist.Raigad Applicants

Let it be known to all concerned that deceased Late Mr.Suhas Mahadev Patil died on 21/04/2021. Therefore the applicant has filed the Misc. Application No.1151, Aapplication for Heirship Certificate Under the Provisions of Bombay Regulation Act VIII of 1827.

**THE SHEDULE OF THE IMMOVABLE PROPERTY**

| | Share |
|---|---|
| 1) Flat No.103, First Floor, Chandra Darshan Hill View, Plot No.64, Sector-6, Karnjande, Panvel, Tal-Panvel, Dist-Raigad. Area : 32.952 sq. mtr. Carpet Area & 6.15 sq.mtr. Flower Bed & 3.25 Sq.Mtrs. Terrace Area Agreement for sale dated 15/03/2014, bearing document No.Panvel 1602/2014 | 50/- |
| 2) Flat No.501, 5 th Floor, A wing, Building No.3, Siddhachal Complex, Survey/Hissa No.290, 295/1, 296, 297/1, (Part), 299/2, 356, Village : Majiwada, Tal & District Thane Area 71.72 Sq. Mtrs. Carpet Area Agreement for Sale Dated 27/12/2007, bearing Document No. Thane-2, 352/2008 | 50/- |
| 3) Unit/Shop No.216, Second Floor, Omega Business Park, Plot No.A-298, A-271, Road No.33, Near ESIS Hospital, Wagle Industrial Esate, Panchpakhadi, Thane Area : 22.83 Sq. Mtrs. Carpet Deed of Assignment date 29/09/2020 bearing Document No. Thane-1, 3476/2020 | 100/- |
| 4) Premises No.708, 7 th Floor, Opal Square, Plot No.C-1, Road No.1, Waghle Industrial Esate, Thane Area : 39.81 Sq. Mtrs. Carpet Deed of Assignment dated 18/11/2019, Document No. Thane-1, 12168/2019 | 100/- |

If any person/s have any objection title, claim share, or any kind of interest in the said share property, which is more particularly described in the schedule hereinabove, is hereby invited, then they may appear in person or through their Advocate, objecting this application in the Court of Civil Judge Sr.Division at Panvel, Dist-Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publication of this notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary order thereon which please note.

Sd/-
Jr.Clerk
Civil Judge, S.D.
Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Superientendent
Civil Judge, S.D.
Panvel

---

मा.राव साहेब
प्रो.जमा रु.६-२५

अर्जदाराचे वकील
श्री.समीर राम कुंभार
वकील उच्चन्यायालय

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३८१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.११/११/२०२१

१) श्री.वंदना विठ्ठल केणी
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.दर्पेश विठ्ठल केणी
वय : २९ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) श्री.अजय विठ्ठल केणी
वय : २७ वर्षे, धंदा : व्यवसाय
४) श्री.अक्षय विठ्ठल केणी
वय : २५ वर्षे, धंदा : व्यवसाय
पूर्वी रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
सध्या रा.फ्लॅट नं. , कान्हा शाम रेसिडेन्सी,
प्लॉट नं.९७, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

ज्याअर्थी कै.विठ्ठल चाहू केणी, रा.फ्लॅट नं. , कान्हा शाम रेसिडेन्सी, प्लॉट नं.९७, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड हे दि.२७/०४/२०२१ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाच्या मिळकती आहे.

**परिशिष्ट अ**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | वडघर ४१ | १६१ | ४ | ०-३०-० | - |
| २ | | ७४ | २ सी | ०-१९-४ | ३.४४ |
| | | १०९ | १ | ०-९१-१ | ७.२५ |
| ३ | वडघर ४७ | १६१ | १ पी | ०-८७-१ | - |
| ४ | वडघर ८४ | १०० | १ब+४अ | ०-४३-५ | ३.४८ |

**परिशिष्ट ब**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमी संपादन निवाडा क्र. | सर्वेक्षणा नुसार बांधकाम क्रमांक | बांधकामाचे /संपादीत जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.) | बांधकामाचा वापर | निवाड्या नुसार भूखंड वाटपाची पात्रता ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | भूखंड वाटपाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी |
| CHIM-ICIG-66 | M-314 M-314/ M-314A M-314B M-314C M-314D M-314E M-314F | १२९.७७ | निवासी | २४१.८६ | वडघर | २ | १३६ | ७०० |

कै.विठ्ठल चाहू केणी यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

तारीख ४/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

Shri.Rao Saheb

Adv. Sanjay K Kanade
Adv. Anil R. Nagdeve
Adv. Gaurav S. Kanade

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE
SENIOR DIVISION, PANVEL, AT PANVEL
CIVIL MISC. APPL. 529/2021
Exh : 8/D
N.D. 24/11/2021

Late Jatish Chandra alias Jyoti alias Jyotish Chandra Bhattacharjee (Deceased)
1) Shri.Jaydeep Jatish Chandra alias Jyoti alias Jyotish Chandra Bhattacharjee
Age : 46 yrs, Occupation : Service
Residing at Flat No.209, Bhamori Plaza,
Near Manmandir Talkies, Vijay Nagar, Indore,
Madhya Pradesh : 452010
2) Shri.Judhajit Jatish Chandra alias Jyoti alias Jyotish Chandra Bhattacharjee
Age : 58 yrs, Occupation : Service
Residing at 102, Atharvakrupa CHS.
Plot No.11, Sec-9, Khanda Colony,
New Panvel (W), Dist-Raigad 410206
3) Smt. Suparna Chakraborty
Age : 53 yrs, Occupation : Service
Residing at. Block C 403, Prasanti Pride
Complex, Tarun Nagar, Dispur, Kamrup
Metro, Assam-781005
4) Shri.Shankar Jatish Chandra alias Jyoti alias Jyotish Chandra Bhattacharjee (Deceased)
4/1) Smt.Champu Chakraborty
Age : 61 yrs, Occupation : Houswife
4/2) Kum. Bhargav Bhattacharjee
Age : 22 yrs, Occupation : Student
4/3) Kum.Aishika Kashyap
age : 15 yrs, Occupation : Student
through her legel guardian mother
Smt. Champu Chakraborty
Applicant No.4/1 to 4/3 residing at 190,
HPC Town ship, Near Shani Mandir,
Panchgram, Hailakandi, Algapur,
Assam 788802 Applicants

Let it be known to all concerned that deceased Late Jatish Chandra alias Jyoti alias Jyotish Chandra Bhattacharjee died on 10/07/2017, leaving behind two sons and one daughter. The wife of Late Jatish Chandra alias Jyoti alias Jyotish Chandra Bhattacharjee i.e Late. Sumitra Jatish Chandra Bhattacharjee died on 07/01/2006. The son of Late Jatish Chandra alias Jyoti alias Jyotish Chandra Bhattacharjee i.e. Late. Shankar Jatish Chandra alias Jyoti alias Jyotish Chandra Bhattacharjee died on 24/02/2016. Therefore the applicant has filed the Misc. Application No.529 for Succession Certificate Under Indian Succession Act. 1925

**THE DETAILS OF THE BANK ACCOUNT FOR WHICH CERTIFICATE IS APPLIED FOR IS AS UNDER**

| S.r. No. | Bank A/C No. | Name of the Bank | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Saving Bank A/C No.54370201 0015281 Saving Account No.03130100 45594 | Union Bank of India, Vijay Nagar, Indore, Madhya Pradesh, Indore - 452010 | Rs.3,38,422.31 (Rs.Three Lakh Thirty Eight Thousand Four Hundred Twenty Two and thirty one paise Only) as On 03/10/2020 |
| 2 | Saving Account No. 031301004 5594 | Union Bank Of India. Assam | Rs.4,32,291.50 (Rs.Four Lakhs Thirty Two Thousands Two Hundred Ninety One and Fifty Paise Only) as on 07/09/2020 |
| | | **Total Amount** | Rs.7,70,713.81 (Rupees Seven Lakhs Eventy Thousand Seven Hundred Thirteen and Eighty One Paise Only) |

If any person/s have any objection title, claim share, or any kind of interest in the said share property, which is more particularly described in the schedule hereinabove, is hereby invited, then they may appear in person or through their Advocate, objecting this application in the Court of Civil Judge Sr.Division at Panvel, Dist-Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publication of this notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary order thereon which please note.

Date : 4/10/2021

Sd/-
Jr.Clerk
Civil Judge, S.D.
Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Superientendent
Civil Judge, S.D.
Panvel

# संक्षिप्त...

## इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कुठेतरी निघून गेल्याने त्याच्या पत्नीने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

पितांबर कोंडीबा पाखरे (५६ रा.करंजाडे, सेक्टर ५) असे असून केस पांढरे, मिशी जाड, चेहरा गोल, रंग सावळा, उंची ५ फुट ५ इंच, पायात चप्पल असून अंगात सफेद रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पो. ना.व्ही.एम.पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

## मोटार ड्रायव्हींग स्कूल ओनर्स असोसिएशनच्या राज्याच्या प्रवक्तेपदी विवेक खाडे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील गुरुकृपा मोटार ट्रेनिंग स्कूलचे विवेक खाडे यांची आज मोटार ड्रायव्हींग स्कूल ओनर्स असोसिशनच्या महाराष्ट्र राज्याच्या प्रवक्तेपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

सामाजिक कार्यासह धार्मिक कार्यात अग्रेसर असणारे रोटरी क्लबचे सदस्य असलेले तसेच विविध सामाजिक संघटनेमध्ये सक्रीय सहभाग घेणारे विवेक खाडे यांचे पन-वेल शहरात अत्यंत जुने असे गुरुकृपा मोटार ट्रेनिंग स्कूल हे आहे. त्यांनी आतापर्यंत केलेल्या कार्याची व संघटनेला केलेल्या सहकार्याची दखल घेवून नुकत्याच झालेल्या बैठकीमध्ये त्यांना सर्वानुमते राज्याच्या प्रवक्तेपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे व तसे पत्र देण्यात आले आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# ई - रिक्षा सुरू होण्यासाठी माथेरान मधील स्थानिकांच्या एकोप्याची गरज

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : जनतेच्या मागण्या मान्य करण्यासाठी जोपर्यंत शासन दरबारी एकोप्याने आणि सर्वानुमते पोटतिडकीने मागणी केली जात नाही तोपर्यंत शासन सुध्दा त्याकडे दुर्लक्ष करत असते अगदी महत्वाची बाब असताना सुध्दा शासनाकडून फारसे गांभीर्याने लक्ष दिले जात नाही.त्यातच माथेरान म्हंटल की इथे लावण्यात आलेले कडक निर्बंध त्यामुळे अधिकारी वर्ग सुध्दा दिलेल्या निवेदनांना अनेकदा केराची टोपली दाखवत असतात. कुणा एका व्यक्तीने महत्वाच्या विषयावर पाठपुरावा केला तरीसुद्धा त्याला जोड ही स्थानीक पातळीवर कार्यरत असणाऱ्या लोकांची भूमिका आणि एकोपा अधिक फायदेशीर ठरतो.



मागील काळात सुध्दा सन २००८ मध्ये कर्जत ते माथेरान मिनीबस सेवा उपलब्ध झाली आहे त्यासाठी स्थानिकांनी अनेक वर्षे पाठपुरावा केला होता त्यामुळे जवळपास चार दशकांपासुन स्थानिकांचे असलेले मिनीबसचे स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले होते. त्याच अनुषंगाने इथली एकंदरीत भौगोलिक परिस्थिती पाहता येणारे पर्यटक हे इथे असणाऱ्या अपुऱ्या सोयीसुविधाच्या अभावामुळे एकदिवसीय पर्यटन करून माघारी फिरतात याचा सर्वाधिक फटका स्थानिक मंडळींना सोसावा लागत आहे. वाहतुकीची गहन समस्या आजही इथल्या स्थानिकांच्या तसेच येणाऱ्या पर्यटकांना अतिशय त्रासदायक बनली आहे. अवाजवी दराने सर्व प्रकारचे इमारतीचे सामान खरेदी करावे लागते त्याचबरोबर जीवनावश्यक वस्तूंच्या किंमी सुध्दा गगनाला भिडल्या आहेत. मुंबई पासून नेरळ स्टेशनपर्यंत येण्यासाठी जेवढा खर्च होत नाही त्यापेक्षाही अधिक रक्कम ही पर्यटकांना केवळ नेरळ ते दस्तुरी नाका आणि तेथून पुढे गावातील हॉटेलपर्यंत घोडा, हातरीक्षा, हमाल यांद्वारे येण्यासाठी खर्च करावी लागत आहे.माथेरान हे अन्य पर्यटनस्थळांच्या तुलनेत खुप स्वस्त असून हॉटेल्स आणि लोजिंगचे दर सुध्दा खिशाला परवडणारे आहेत त्यामुळे इथे बाराही महिने पर्यटकांची संख्या वाढत आहे. वाहतुकीची सुरक्षित सुविधा उपलब्ध नसल्याने येणारे नव्वद टक्के पर्यटक हे एकदिवसीय असतात त्यामुळे ऐन सुट्टयांच्या हंगामात जरी माथेरान हाऊसफुल्ल दिसत असले तरी एकदिवसीय पर्यटक हे खर्चिक नसल्याने व्यापारी,दुकानदार वर्गाला याचा फारसा उपयोग होत नाही.लवकरच या सुंदर पर्यटनस्थळाच्या क्ले ब्लॉक रस्त्याची कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर असून पायी फिरणाऱ्या पर्यटकांसाठी एक पर्वणीच ठरणार आहे. हे मुख्य रस्ते धुळवीरहीत होणार आहेत त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही.

आजच्या सद्यस्थितीत बहुतांश पर्यटनस्थळांवर मोटार वाहन उपलब्ध असतात त्यामुळे अगदी सहजपणे पर्यटकांना सोयीस्कर होत असते. माथेरान हे संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यामुळे इथे मोटार वाहनांना बंदी आहे या प्रदूषण मुक्त गावात बॅटरीवर चालणारी ई रिक्षा हाच एकमेव पर्याय उपलब्ध आहे आणि त्यासाठी येथील श्रमिक हातरीक्षा संघटनेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे हे मागील आठ वर्षांपासून शासन दरबारी पाठपुरावा करीत आहेत. काही मूठभर लोकांना ही महत्वाकांक्षी व्यवस्था नकोशी आहे परंतु इथले पर्यटन वाढविण्यासाठी आणि पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असलेल्या भूमिपुत्रांच्या भविष्याचा वेध लक्षात घेता पर्यावरण पूरक ई रिक्षा अगदीच सोयीस्कर आणि स्वस्त दरात पर्यटकांना उपलब्ध होऊ शकते. दर पाच वर्षांनी नगरपरिषदेच्या निवडणुकीत ई रिक्षाच्या विषयाला बगल देऊन मते मिळविली गेली आहेत कारण जे काही मूठभर लोक ह्या व्यवस्थेच्या विरोधात आहेत ज्यांनी आजपर्यंत ह्या गावाला विकासापासून रोखून धरले आहे जी काही मोजकीच मंडळी ह्या गावासाठी शापित बनलेली आहेत अशांना निवडणूक काळात गोंजारले जाते.जग एकविसाव्या शतकात उत्तुंग भरारी घेत असताना मुंबई आणि पुण्यापासून अगदी जवळ असलेले हे टुमदार स्थळ आजही केवळ वाहतुकीची व्यवस्था नसल्याने खूपच पिछाडीवर पडले आहे. समस्त लोकप्रतिनिधी, गावातील विविध मंडळाच्या पदाधिकारी, संस्थेच्या प्रमुखांनी यासाठी सुनील शिंदे यांच्या खांद्याला खांदा लावून गावाच्या विकासासाठी हे सह्याद्रीच्या कुशीत वसलेले ठिकाण विकसनशील बनविण्यासाठी पुढाकार घेऊन शासन दरबारी एकोप्याने पाठपुरावा केल्यास काही अशक्य बाब नाही. ई रिक्षाची ही महत्वपूर्ण सुविधा निर्माण झाल्यास हे सर्व श्रेय स्थानिकांनाच लाभणार आहे.

# स्व. नगरसेविका मुग्धा लोंढे यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेच्या नगरसेविका स्व. मुग्धा लोंढे यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त येथील विरूपाक्ष मंगल कार्यालयात रविवारी (दि. ३) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास प्रतिसाद लाभला. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्व. मुग्धा लोंढे यांच्या प्रतिमेला वंदन करून रक्तदान केले.

जनहित संवर्धक मंडळ, कच्छ युवक संघ आणि युवानाद ढोल पथक यांच्या सहकार्याने झालेल्या या शिबिराची सुरुवात आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी स्व. मुग्धा लोंढे यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून झाली.

शिबिरास महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, मनपा महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर, नगरसेवक राजू सोनी, अजय बहिरा, नितीन पाटील, नगरसेविका चारुशीला घरत, रूचिता लोंढे तसेच गुरूनाथ लोंढे, अमित ओझे, चिन्मय समेळ आदी उपस्थित होते.

ज्यांनी कोरोना काळात रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी जास्तीत जास्त रक्तदान केले त्या नंदाजी ओझे, जनहित संवर्धक मंडळाचे सुहास सहस्त्रबुद्धे, युवानाद ढोल पथकाचे प्रथमेश सोमण, कच्छ युवक संघाचे धीरूभाई मारू यांचा या वेळी सन्मान करण्यात आला.

### रायगड जिल्ह्यात कांदळवन निसर्ग पर्यटन बहरणार

# काळींजे व दिवेआगर येथे कांदळवन निसर्ग पर्यटन जिल्ह्यातील पहिला पथदर्शी प्रकल्प

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यात सर्वाधिक जवळपास १२०. ९७ चौरस किमी एवढे विस्तीर्ण कांदळवन क्षेत्र आहे. समृद्ध जैविवधतेने बहरलेल्या या कांदळवनांमध्ये निसर्ग पर्यटनाला सर्वाधिक वाव आहे. यामुळे कांदळवन व तेथील बहुविध जैवविधतेचे संरक्षण आणि संवर्धन तर होईलच पण मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसाठी नवा मार्ग खुला होणार आहे. त्यामुळेच कांदळवन संरक्षण व उपजीविका निर्माण योजने अंतर्गत आणि 'कांदळवन प्रतिष्ठान' निसर्ग पर्यटना अंतर्गत श्रीवर्धन तालुक्यातील काळींजे व



दिवेआगर या गावांमध्ये कांदळवन निसर्ग पर्यटन हा जिल्ह्यातील पहिला पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे.

कांदळवन कक्ष रायगड व कांदळवन प्रतिष्ठान रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने येथे वनक्षेत्रपाल अधिकारी कांदळवन कक्ष अलिबाग-रायगड समीर शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीवर्धन मिलिंद राऊत, सहाय्यक संचालक निसर्ग पर्यटन वंदना झवेरी यांच्या मार्गदर्शनाखाली कांदळवन निसर्ग पर्यटनाचा नुकताच आढावा घेण्यात आला. त्या अनुषंगाने आगामी काही दिवसांत येथे कांदळवन निसर्ग पर्यटनास सुरुवात होईल. अशी माहिती वन-क्षेत्रपाल समीर शिंदे यांनी दिली.

# रोहा तालुक्यातील शाळा विद्यार्थ्यांनी बहरल्या

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**



कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्यात दिड वर्ष शाळा बंद होत्या. पर्यायाने रोह्यातही शाळा बंद ठेवाव्या लागल्या. शासनाच्या नविन धोरणानुसार सोमवारी ४ ऑक्टोबर रोजी रोहा तालुक्यासाह जिल्ह्यात शाळा सुरु झाल्या. रोहा तालुक्यातील रोहा, कोलाड, नागोठणे, चणेरा व घोसाळा विभागात शाळा सुरु झाल्या. त्यामुळे रोहा तालुक्यातील शाळा विद्यार्थ्यांनी बहरल्याचे चित्र दिसले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या चेह-यावर आनंद असल्याचे दिसून आले.

रोहा तालुक्यातील शाळा नव्या उमेदीने पुन्हा एकदा कोरोनाचे सर्व नियम पाळून सुरु झाल्या. त्यामुळे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वर्गात आनंदाचे वा-तावरण निर्माण झाले. मात्र आश्रम शाळा सुरु न झाल्याने आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये नाराजी असल्याचे दिसून आले.तर नागोठणे मधील जे.एच.अंबानी हायस्कूल मधील सर्व विद्यार्थ्यांची आरटीपीसी आर टेस्ट घेऊन आम्ही शाळा सुरु करणार असल्याने चार दिवस शाळा उशिरा सुरु करणार असल्याचे संकेत शाळा व्यवस्थापनने दिले.

तब्बल दीड वर्षानंतर विध्यार्थ्यांचा किलबिलाट सुरु झाल्याने विद्यार्थ्यांच्या शाळा गजबजून गेल्या. शाळेत जाण्यासाठी विद्यार्थी व पालक यांनी तीन दिवस आगोदर खरेदीसाठी रोह्याच्या बाजारपेठेत गर्दी केली होती. पूर्वतयारीसाठी विद्यार्थ्यांची लगबग पाहून पालक वर्गात उत्साहाचे वातावरण होते.

# जिल्हा परिषद निवडणूक शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस महाआघाडी एकत्र लढणार : आ.महेंद्र दळवी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

शेकापला अलिबाग-मुरुड मतदार संघातून हद्दपार करण्यासाठी आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूका शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस एकत्र येऊन लढविणार असल्याची घोषणा आ.दळवी यांनी केली आहे. आज (३ ऑक्टोबर) राजमळा येथे झालेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात त्यांनी ही घोषणा केली.




या नव्या समीकरणाची जुळवणी मागील काही दिवसांपासून सुरु होती. वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केल्यानंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या तळागाळातील कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊनच ही त्रिपक्षीय आघाडी झाली असल्याची माहिती आ. महेंद्र दळवी यांनी आजच्या कार्यकर्ता मेळाव्यात दिली. या एकीच्या बळाने आपण शेकापला या मतदार संघातून हद्दपार करु असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

नव्या आघाडीमुळे शेकाप एकाकी पडला आहे. त्यांच्या नेत्यांना पराभव समोर दिसू लागल्याने शेकापचे नेते अर्थहिन आरोप करु लागले आहेत. त्यांच्या आरोपांना घाबरण्याची वेळ संपली असून शेकापचे अनेक वर्षांचे वर्चस्व संपवण्यासाठी सज्ज होण्याचे आवाहनही आ. महेंद्र दळवी यांनी कार्यकर्त्यांना केले.

राजमळा येथील मेळाव्यास जिल्हा परिषदेचे विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, शिवसेनेचे अलिबाग तालुकाप्रमुख राजा केणी, मुरुड तालुकाप्रमुख श्रीकांत डोंगरीकर, महिला जिल्हा संघटीका दिपेश्री पोटफोडे, जिल्हा खजिनदार सुरेश म्हात्रे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य संतोष निगडे, ॲड.सुशील पाटील यांच्यासह अलिबाग, मुरुड तालुक्यातील शिवसेना उपतालुकाप्रमुख, विभागप्रमुख,महिला आघाडी प्रमुख, व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते औषधी वनस्पतींचे रोपण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त सेवा व समर्पण अभियानांतर्गत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ३) औषधी वनस्पतींचे रोपणाचा कार्यक्रम कामोठे येथे पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन कामोठे शहर भाजप युवा मोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केले होते. २० प्रकारची विविध उपयोगी औषधी आयुर्वेदिक झाडे या वेळी लावण्यात आली.



या कार्यक्रमासाठी उपमहापौर जगदीश गायकवाड, कामोठे मंडळ अध्यक्ष रवींद्र जोशी, नगरसेवक डॉ अरुण कुमार भगत, नगरसेवक गोपीनाथ भगत, नगरसेवक विकास घरत, नगरसेवक विजय चिपळेकर, नगरसेविका पुष्पा कूत्तरवडे,नगरसेविका संतोषी तुपे, नगरसेविका हेमलता गोवारी, युवा नेते हेप्पी सिंग, समाजसेवक रवी गोवारी, समाजसेवक प्रकाश पाटील ,सरचिटणीस शरद जगताप , व्यापारी आघाडीचे अध्यक्ष नानाशेठ मगदूम,बूथ अध्यक्ष स्वप्नील पाटील, संदीप तुपे, प्रज्ञा प्रकोष्ठ संयोजक सुहास पाटील, हरजिंदर कौर, दीपाली तिवारी, सोशल मीडिया संयोजक प्रवीण वाघमारे, युवा मोर्चा सरचिटणीस नवनाथ भोसले, विजय लोखंडे, मनीषा वणवे, सुरेखा लांडे, जयश्री गाडगे, लता गोडगे, सोनाली खरटमोल, उत्तम जाधव, कल्पना जाधव, अनिता शेट्टी, अमित शेलार, आदित्य भगत, धीरज सिंग, अमित सावंत, अमित झावरे, प्रवीण कोरडे, चेतन चव्हाण, मयांक कुमार, मोहन जोशी, अमित जाधव, सागर तांबे, श्याम तोड्कर, अखिल पन्हाळकर, राकेश झा, श्री. बडे, रमाकांत मालवणकर, संजय लोखंडे, दिगंबर कुलकर्णी,भाजपा सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

# भन्नाट ऑफर; कोरोना लसीचा एक डोस घ्या अन् मिळवा मोफत तेलाची पिशवी

### युवा अनस्टॉपेबल व समाजसेवक कृष्णा महाडिक यांचा स्तुत्य उपक्रम

**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा** : कोरोनापासुन सुटका मिळविण्यासाठी अनेक देश सध्या लसिकरण मोहिमेवर भर देताना दिसत आहेत. काही ठिकाणी नोंदणी करुनही लस मिळत नाहीत तर काही ठिकाणी लस असुन ती घेण्यासाठी नागरिक तयार नाहीत. कोरोनाच्या दुसरया लाटेने संपुर्ण जगात हाहाकार माजला आहे याचा सर्वाधिक फटका भारताला बसला आहे.१ मे पासुन १८ वर्षांवरिल सर्वांना लस मिळण्यास सुरवात झाली परंतु लसीचा अभाव असल्याने अनेकांना नोंदणी करुनही लसिकरणाची वाट पहावी लागत आहे.परंतु जगात असे काही देश आहेत जे लसीकरण करण्यासाठी लोकांना विविध आणि भन्नाट ऑफर्स देत आहेत.मोदी सरकार लवकरात लवकर देशातील सर्व नागरिकांचे लसीकरण करण्यासाठी प्रयत्न आहेत त्यासाठी सर्व प्रकारचे प्रयोग सरकार करत आहे.गुजरात सरकारने महिलांनी डोस घेतल्या नंतर तेलाची पिशवी बक्षीस म्हणुन मोफत दिली आणि महिलांमध्ये लसिकरणाचे प्रमाण वाढले.



नाना स्मृती पालकर ट्रस्टचे व्यवस्थापक समाजसेवक कृष्णा महाडिक यांनी युवा अनस्टॉपेबल अहमदाबाद गुजरात या संस्थे बरोबर चर्चा करुन गुजरातचा हा प्रयोग महाराष्ट्रात राबविण्यासाठी पाठपुरावा केला.या सामाजिक संस्थेने परवानगी दिल्यानंतर रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव आणि तळा तालुक्यात लसिकरण करणारया महीलांना तेलाची पिशवी बक्षीस म्हणुन मोफत देण्याचे आयोजन करण्यात आले वीस हजार लीटर तेल पिशव्यांचा साठा युवा अनस्टॉपेबल अहमदाबाद गुजरात या संस्थेच्या वतीने पुरविण्यात आला असुन अभिनव ज्ञान मंदिर उसर येथे लसिकरणाचे आयोजन करुन महीलांना तेल पिशवी बक्षीस म्हणुन वाटप करण्यात आले यावेळी नाना स्मृती पालकर ट्रस्टचे व्यवस्थापक समाजसेवक कृष्णा महाडिक, युवा अनस्टॉपेबल अहमदाबाद गुजरातचे महाराष्ट्र प्रतिनिधी राजेश पुरोहीत, तळा पंचायत समिती सभापती अक्षरा कदम, उसर ग्रामपंचायत सरपंच सायली घाग, वैद्यकीय अधिकारी डॉ.गोरेगावकर, मुख्याध्यापक श्री.दुधाळ, शांतराम नटे, पत्रकार भारत गोरेगावकर,संजय रिकामे आदि मान्यवर उपस्थित होते.

महिलांसाठी लसिकरण झाल्यानंतर बक्षीस म्हणुन मोफत तेलाची पिशवी देण्यात आल्यामुळे येथे उपस्थित असलेल्या महिलांचे कोवीड लसिकरण संदर्भात अनेक गैरसमज दुर करुन जास्तीत लसिकरण होत असल्याचा दावा युवा अन स्टॉपेबलचे महाराष्ट्र प्रतिनिधी राजेश पुरोहित यांनी केला असुन सध्या वीस हजार लीटर तेलाचा पुरवठा करण्यात आला असुन अजुन दहा ते पंधरा हजार लीटर तेलाचा साठा संस्थेच्या मार्फत करण्यात येईल असे सांगितले.